म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ४९३

REFBK-0019500
REFBK-0019500

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४९३

# लीन शाहीर

[ पोवाडा ]



REFBK-0019500
REFBK-0019500

शाहीर

**वासुदेव भास्कर दामले, बी. ए.**

त्रिशतसांवत्सरिक–शिवोत्सव

किंमत दीड आणा.

# प्रस्तावना

श्री० वा. भा. दामले, बी.ए. यांनीं रचलेलें 'शिवकालीन शाहीर' हें लघुकाव्य वाचून पाहिलें. त्यांत अशी कल्पना केली आहे कीं, 'दुबळ्या व नालायक संभाजीला जागृत करण्यासाठीं कोणी शिवकालीन शाहीर जुन्या आठवणीचा पोवाडा बोलत आहे. पुढें संभाजीच्या कानीं तो जागृतीचा बोल पडण्याचें आलेंच नाहीं'. मध्येंच संभाजीला घेरणाऱ्यानीं आपलें जाळें टाकून शाहीराचा बंदोबस्त केला.

हें काव्य एका ऐतिहासिक विषयावर आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, श्री छत्रपती शिवाजीमहाराजांचें चरित्र–विशेषें करून पूर्व-चरित्र–हल्लीं शोधलें जात आहे. आणि एवढें निश्चित म्हणतां येईल कीं, गेल्या वीसपंचवीस वर्षांपासून जें त्या चरित्राचें स्वरूप आपणांसमोर आहे त्यांत अतिशय महत्त्वाचे असे बदल आपणांस अवश्य करावे लागतील. श्री छत्रपती संभाजीमहाराजांच्या कारकीर्दीविषयींही तसेंच म्हणतां येईल.

ही नवीन निघालेली माहिती सुशिक्षित जनतेच्याही सर्व थरांत अद्यापि पसरली नाहीं. मग तेथून त्या द्वारें सर्वत्र जनतेंत ती पसरण्याचें दूरच ! अशा स्थितींत व्हावयाचीं काव्यें हीं ऐतिहासिक आधारावर रचलेलीं असावीं ही अपेक्षा इतक्यांतच पूर्ण व्हावयाची नाहीं. अफजलखान-शिवाजी प्रसंग किंवा खुद्द संभाजीची योग्यता यांविषयीं शोधक इतिहासकारांनीं आतां जुनीं पुराणीं मतें सोडल्यासारखींच आहेत.

तथापि कविकृतीकडे काव्य म्हणूनच पाहिलें पाहिजे. इतिहासाचें

# शिवकालीन शाहीर

काळा काळा काळ अरीचा मावळ वीर गडी
खांदा कांबळ शिरीं पागुटें रकटें परिवेढी ॥
धरुनि तुणतुणें दुजेंच जीवन कवळुनि हृदयाशीं
हळुच छेडुनी मधेंच हितगुज करिताहे त्याशीं ॥
तुणतुण नादीं गुणगुण अपुली अस्फुट मिळवूनी
अठवुनि अठवुनि गीत मनाशीं पहातसे म्हणुनी ॥
आठवतांची कळी खुलुनिया गाई मोठ्यांनें
वाटे त्याला तरुतति डुलते स्वकीय गानानें ॥
हास्य मुखावरि सहजीं विलसे सूरहि उंच चढे
क्षणांत डोळे वर लावुनिया चिंताक्रान्त पडे ॥
तरुतति डुलली हाही डुलला प्रसन्न मुख झालें
'भले बहादर' एकच वचनें वनंही दुमदुमलें ॥
क्षणांत घुमतो क्षणांत विरतो नाद तुणतुण्याचा
सह्याद्रीच्या उंच गिरीवर कोठुनि कोणाचा ॥
बसलेली कुणि अंधुक मूर्ती तालतरूखालीं
स्वागत तुमचें वीरवरांनो ! करावया बसली ॥
तीच आकृती हेतु मनींचे तुमच्या पुरवील
शिवरायाचें गीत गाउनी हृदयें हलवील ॥
गीत तयाचें जुळवुनि झालें आतुर या समया
स्फूर्तीदायक वीररसाचा पोवाडा गाया ॥

शिवरायाचा तनय करंटा लोळे व्यसनांत
स्वराज्यनौबदनिनाद घुमला कां ना कानांत ? ॥

वीरापोटीं तनय करंटा विधिघटना गूढ
कुठें शिवाजी तनय तयाचा कुठें महामूढ ॥
मूढ, लफंगे, व्यसनी सारे जमले त्या भवतीं
लीला नवनव काढुनि निशिदिनिं राजा ठकवीती ॥
अधःपात हा शिवतनयाचा पाहुनि हळहळली
ढळढळ अश्रू अविरत जनता शोकभरें ढाळी ॥
शिवरायाचें कार्य तडीला कैसें जाईल
ह्या चिंतेनें प्राण प्रजेचे झाले व्याकूळ ॥
शिवरायाचे दुजेच कलिजे मावळ वीरगडी
हाय खाउनी स्वस्थ न बसतां घेती कार्यिं उडी ॥
शिवरायाच्या स्वातंत्र्याच्या कार्यीं भरलेलें
कर्मयोग हा धर्म आमुचा गूढ बिंबलेलें ॥
मित्र जिवींचे संभाजीनें छळले आजवरी
द्वेष गिळोनी स्वराज्यकार्यीं देती देह परी ॥
स्वातंत्र्यास्तव बेकी मोडुनि एकि जयें केली
धन्य मराठे अखंड त्यांनीं कीर्ति संपादिली ॥
राजा व्यसनीं बळि पडलेला पाहुनि मन द्रवलें
हताश कधिंही परी न होतां वळवाया झटले ॥
वीररसाची संभाजीची केवळ मूर्ति खरी
वीररसाच्या पोवाड्यांनीं वळेल कांहिं तरी ॥
उद्भवतां हा विचार हृदयीं पोवाड्या असला
कर्मवीर ते फिरतां फिरतां दृष्टिस हा पडला ॥

ः ः ः

त्या वीरांना वंदन करुनी पोवाड्या वदला
"आज्ञा अपुली निवेदन करा या मज दीनाला ॥
प्राण आमुचा हरपुनि गेला गेला शिवराणा
आश्रय तुटतां अमुचा कैसा चालावा बाणा ? ॥
गीत गाउनी मन वळवावें माझ्या मनिं आलें
शिवरायाचें गीत म्हणोनी परिश्रमें रचिलें" ॥

नादीं पडला जो व्यसनांच्या ताळतंत्र सुटला
मार्गी फिरुनी कधीं तरी तो येइल का बोला ? ॥
"राजा व्यसनीं पाहुनि विटलों 'नको नको धंदा'
विचार एकच मनीं दाटतां कळवळलों कितिदां ॥
गेले गेले शिवरायाचे सुदिन पार गेले
हिरा लोपतां दैव आमुचें एकाकीं फिरलें ॥
झालें गेलें सर्व संपलें कांहिं न जरि उरलें
गत गोष्टींच्या आठवणी परि होती प्रतिशल्यें ॥
मन रिझवाया शिवरायाचा पोवाडा रचिला
येउनि येथें शांत स्थळीं मीं म्हणुनी पाहियला ॥
दर्शन घडलें अशांत अपुलें वीरवरांचें मला
मज गरिबाचें भाग्य बापहो ! आलें उदयाला ॥"
"त्या शिवबाचा तूं पोवाड्या तुझाच पोवाडा
ऐकवुनी मन वळवायाचा यत्न करी थोडा"॥
"अजुनि न झाला पोवाड्याचा माझ्या अपमान
काय नशीबीं लिहिलें माझ्या कळविल का कोण ? ॥
मम गीताचा घडावयाचा असला अपमान
हीच मनीषा दीनदयाळा ! येवो मज मरण ॥"
"कर्मवीर का अपयश येतां सोडिति यत्नांला
शिकस्त अमुचीं करुनि वळवुंया त्या शिवतनयाला" ॥

⁘ ⁘ ⁘

संभाजीचा रायगडावरि भरला दरबार
चांडाळांचा व्यसनांधांचा दुसरा बाजार ॥
संभाजीला भुलवुनि खुलवुनि चैन चालवीती
स्वार्थापरता अन्य तयांना धर्म न या जगतीं ॥
जन हळहळती परि न तयांच्या हृदया पीळ पडे
स्वार्थनरकिंचे वळवळणारे चिळीसवाण किडे ॥
शिवरायाच्या दरबारीं जे मान पावलेले
अधोवदन ते होउन एके बाजू बसलेले ॥

ज्या वीरांची शिवरायानें पाठ थोपटीली
नशिबीं त्यांच्या मानखंडना विधिनें कां लिहिली ? ॥
शिवरायाच्या रायगडावरि नीचांचा मेळा
हा काळाचा अगम्य महिमा कुंठवितो मतिला ॥
मंडळ अपुलें कलुषा घेउनि संभाजीभंवतीं
मंडळ करुनी अगदीं निकटीं बसला तो वरतीं ॥
थाट तयांचा काय पुसावा गुलजारांचा या
लालभडक ती मखमालीची बंडी घालुनिया ॥
तलम रेशमी वरि अंगरखा आंगीं घालोनी
घट्ट चढवुनी तुमान गोंडा देती सोडूनी ॥
सदैव भरलें मुख दर्पानें वारुणिच्या त्यांचें
धुंदीमध्यें मूर्तिमंत सुख समोर कां नाचे ? ॥
मंदिल भरजरि शिरीं बांधुनी खोंविति शिरपेंच
मऊ रेशमी चढाउ चढवुनि करिति मंद नाच ॥
मदिराव्यसनें शिवरायाचा तनय पार बुडला
केवळ एका व्यसनें गेला देशशत्रु झाला ॥
सर्व गुणांवर मदिराव्यसनें विरजण पडलेलें
दाद कशाची विचार कुठला पंगू मन झालें ॥
मदनाचा तो मोहक पुतळा एकाकीं वदला
" पोवाड्या तव पोवाडा गा ! ऐकवि आम्हांला ॥
शिवरायाचें गुणवर्णन तूं काय बघों केलें
वीररसाचें एकसारखे प्याल्यावर प्याले ॥
वंदन करुनी बैठक घेउनि पोवाड्या बसला
छेडुनि अपुलें नाद तुणतुणें मंजुळ काढियला ॥
आज्ञा होतां पोवाड्या तो गाई पोवाडा
छेडुनि अपुलें स्वयें तुणतुणें लावी सूर खडा ॥

⁘ ⁘ ⁘

" शिवरायाचा काळ आगळा होउनिया गेला
चित्र तयाचें वठवायाला आहें मी दुबळा ॥

क्रमांक नं. १३४

गुलामगिरिची रजनी सरुनी स्वतंत्रता उदय
ह्या देशाच्या इतिहासांतिल अपूर्व हा समय ॥
उषा-सुंदरी सुहास्यवदनें प्राचीपट सारी
लावण्यानें भारुनि टाकी जनता ती सारी ॥
वीणा छेडुनि प्रभातदेवी सुस्वर गान करी
भरतभूमिला स्वातंत्र्याचा मंगल बोध करी ॥
ऊठ भारता ! नितान्त नटला निसर्ग अवलोकीं
खगकुळकूजित कर्णमनोहर श्रवण करीं वेगीं ॥
ही जडसृष्टी अनंतरूपें नटलेली राहे
चैतन्याचा शीत सुगंधित वात मंद वाहे ॥
सृष्टी नटतां नीज सरेना काय तुझी अजुनी
सभोंवार तूं स्वातंत्र्याचें सौख्य पहा नयनीं ॥
भारत-नलिनीनेत्र उमलतां तममूर्ती उडली
स्वातंत्र्याची स्फूर्ती हृदयीं क्षणांत उद्भवली ॥
मांगल्याचा प्रेमरंग हा मंगलमय पाहीं
सृष्टी सगळी स्वकीय रंगीं रंगवुनी राही ॥
ओसरणारा उद्धत वायू शांतपणें वाहे
स्वातंत्र्याची परमपावना ज्योती खुलतांहे ॥
भिन्नपणाचा भाव लोपुनी ऐक्यध्वनी उठला
भारतभूचा भाग्योदय हा समीप जणुं आला ॥
उद्भवतां हा दिव्यभाव रवि पीतांबर ल्याला
भरतभूमीच्या स्वातंत्र्याचा अरुणोदय झाला ॥
स्वातंत्र्याची चिन्मयमूर्ती स्वतंत्रता देवी
स्वातंत्र्याचीं मंगल स्तोत्रें गाउनि कवि विनवी ॥
स्वातंत्र्याच्या रणीं रंगुनी वीरयशा सेवूं
भरतभूमिचे सुपुत्र आम्ही अभिमानें म्हणवूं ॥ ”

⁘ ⁘ ⁘

“स्वतंत्र आम्ही स्वतंत्रतेला परके कां झालों
गुलामगिरिच्या नरकीं कैसे कीटकसे पडलों ॥

गेलें अमुचें स्वत्व लयाला गेला अभिमान
परदास्यानें परावलंबी झाली मति हीन ॥
मदमत्तांचा शब्द झेलण्या स्पर्धा कां चाले
कथा धन्यता कृतींत कसली कोणा जरि कळलें ॥
स्वातंत्र्याची सुधा मधुतमा ज्यांनीं चाखियली
त्याच अम्हांला सुधा-वारुणी नुमजे भेद मुळीं ॥
जितजेत्यांचा सेवक स्वामी धर्म असे वदती
भ्रामक असली कदा कल्पना शिरली भूवरतीं ॥
स्वामी अमुचा खरा कोणता ? सेवक कोणाचे ?
अमुचा स्वामी देश आमुचा सेवक अम्हि त्याचे ॥
देशजननिचा घेउनि चावा बसला जो साप
ठेंचुनि त्याचें तोंड लागलें कोणाला पाप ? ॥
दूध पाजितां गरल टाकिती दुष्ट अशी जाति
कृतघ्न जाती वधुनि महात्मे पुण्यातें वरिती ॥
लोकसंग्रहाकारितां केवळ कार्य असें ज्यांचें
भारतभूचे लाल बोलले काय तरी वाचे ? ॥
स्वराज्यनौबद एक दिलानें त्यांनीं वाजविली
प्रचंड तीचा ध्वनी उसळतां सत्ता चळचळली ॥ ”

“ शिवरायाचें परमपूत यश परिसुनि नच रमला
असा करंटा कोण मराठा सांगा तरि मजला ॥
स्वतंत्रतेचा कालिजा शिवबा राणा रणगाजी
ज्ञात न ज्याला असा मराठा असेल का आजी ? ॥
गोविप्रांचा असह्य देखुनि छळ जो गहिंवरला
स्वकीय धर्म प्रतिपाळाया ग्रहण करी आसिला ॥
सहाय असिला असे भवानी धन्य किती त्याची
नसेल उत्सुक कोण गावया स्तोत्रें शिवबाचीं ? ॥
स्वराज्यसंजीवनी जयाला समर्थ शिकविती
बोध ठेवुनी मनीं जयानें केली थोर कृती ॥

त्या शिवबाचें मंगलमय मी गातों यश आजी
श्रवण कराया स्वतंत्रतेचे कंठमणी या जी ॥
प्रतापसिंहा ! भारततिलका ! या हो या समया
निजतनयाचें यश परिसाया राजे ! परता या ॥
शिवरायाचें यश परिसाया तानाजी या हो ॥
सगळें अपुलें मावळ घेउनि बंधूसह या हो " ॥

⁂ ⁂ ⁂

शिवरायाची स्वराज्यनौबद दशोदिशीं घुमली
अदिलशहाच्या हृदयीं धडकी त्या नादें भरली ॥
'सत्ता अमुची उलथायाला कोण पुढें येतो ?
यवन-केसरीगुहा स्वकीया कोण असें म्हणतो ? ॥
झांप घालतो पतंग असला दीपावरि कोण ?
भस्म व्हावया इच्छा धरितो काफर हा कोण ? ॥
ज्यानें केला जातभाइचा माझ्या अपमान
अदिलशहाला असा मराठा होइल कां सहन " ॥
भरवुनि अली-सरदारांचा अपुल्या दरबार
'कोण मराठा पकडुनि आणायाला धजणार ? ' ॥
अदिलशहाचा अफजुल्ला हा प्रसिद्ध सरदार
'मिशा पिळोनी पकडुनि आणिन वदला मी चोर ॥
'अफजुल्लाच्या हातुनि सुटला गनीम कोणतरी
मी पैजेचा विडा उचलतों भरल्या दरबारीं ॥
खाविंदांना वंदन करुनी निघतों कार्याला
काफर सुटतो कसा पहातों' वदला अफजुल्ला ॥
सेना घेउनि कूच कराया अफजुल्ला लागे
गर्वभरानें धुंद होउनी उद्धतसा वागे ॥
पवित्र अमुचीं देवस्थानें पदतलिं तुडवीलीं
गोविप्रांना अनंत कपटें मार्गीं खान छळी ॥
जितजेत्यांचें भक्ष्य लेखुनी जुलूम करणार
अंजन नयनीं यवनांधांनो ! तुमच्या पडणार ॥

परमेशाची हीच मनीषा घडि तुमची भरली
बांध घालण्या त्या इच्छेला आहे कोण बळी ? ॥

⁘ ⁘ ⁘

खान छावणी वांई–सन्निध देउनिया बसला
शिवरायाला कृष्णाजीसह निरोप धाडियला ॥
" तुज लढण्याची इच्छा असली सिद्ध तरी होई
अथवा दांतीं तृण धरुनीया शरण मला येई " ॥
श्रीशिवराणा कृष्णाजीला सन्निध घेवोनी
स्वराज्य-निष्ठा बोधुनि त्याला घेई वळवोनी ॥
" वंदन माझें विप्र म्हणुनिया पहिलें तुम्हांला
यवनांधांची थुंकी झेलुनि मान कुठें बोला ? ॥
धर्म आमुचा बुडवायाला सदैव जे टपती
अमुच्या माता भ्रष्टवुनी जे आनंदें डुलती ॥
गोमाताचा द्विजोत्तमा छळ सहन कसा करितां ?
कशी साहतां देवस्थानें पदतलिं तुडवीतां ? ॥
जुलुमी सत्ता न्यायी वदतां द्विजोत्तमा ! कैशी ?
स्वामी अमुचा खरा कोणता सांगा हें मजशीं ॥
देह वेंचण्या स्वातंत्र्याच्या कार्यीं मी राजी
द्विजोत्तमा ! मज मंगल अपुला आशी द्या आजी ॥
महाराष्ट्र हा आशीर्वादें मंगलमय अपुल्या
स्वातंत्र्याच्या पावनकार्यीं झटेल लढण्याला ॥
निश्चय अमुच्या मनीं बाणतां विलंब मग कसला
महाराष्ट्र हा अमुचा तेव्हां स्वतंत्र होण्याला ॥
शिवरायाची वाणी परिसुनि विप्र गहींवरला
पश्चात्तापें विप्र मानसीं खिन्न तदा झाला ॥
" ब्राह्मण असुनी यवनांधाची सेवा मीं केली
शिवराया तूं स्वराज्यसंजीवनी मला दिधली ॥
विजयहार तव कंठीं घालिल स्वतंत्रतादेवी
स्वराज्यसंस्थापक शिवराणा वदोत जन भावी " ॥

" कष्टी होउनि विप्रवरा मज कष्टवितां कां जी
अखिल मराठा-दुःख सहाया शिवबा हा राजी ॥
स्वातंत्र्याच्या कार्यीं काया द्विजोत्तमा वाहीं
पातक क्षालन करावयाची संधि न दवडीं ही " ॥

⁘ ⁘ ⁘

शिवरायाची विश्वासाची मूर्ती विश्वास
अरिदळ निरखुनि व्यंगें रिपुचीं कथितो शिवबास ॥
" तुळजापुरची माय भवानी खानें भंगियली
पंढरपुरची विठूमाउली पदतलिं तुडविली ॥
कानीं पडतो गोमातांचा हंबरडा राया
सैरावैरा धांवत सुटती सैनिक देखुनिया ॥
तुडवित सगळी प्रजा चालला धुंदपणें खान
शासन करण्या समर्थ शिवबा तुजविण त्या कोण ? ॥
आर्तजनाच्या आर्तरवानें दुमदुमली धरणी
माय भवानी तारिल आम्हां केव्हां येवोनी ॥
मायबाप तूं शिवबा ! अमुचा तारी या समयीं
स्वराज्कार्यी देह वाहतों आम्ही तव पायीं " ॥
" माय भवानी रक्षण असुचें करावया बसली
स्वातंत्र्याच्या रणीं मराठे घ्या हो घ्या उसळी ॥
रजनी सरतां दिन उदयाला अवश्य येणार
सत्कार्याला हात घालतां मिळतो जयहार ॥
अपयश येतां उत्साहाला अधिक भरे उसळी
सत्कार्याची अशी थोरवी ठावी धरणितळीं ॥
कार्यीं अमुची निष्ठा देखुनि विजयश्री माळ
ह्या देशाच्या अवश्य कण्ठीं अपुली घालील " ॥

⁘ ⁘ ⁘

शिवरायाचा वकील जाउनि विनवी खानाला
" शरण शिवाजी अनन्यभावें आला अपुल्याला ॥

बलवंताशीं झुंजायाला आहें मी दुबळा
दया करोनी मज दीनाला आतां सांभाळा ॥
मुलुख आपुला परत द्यावया आहें मी राजी
खाविंदांनीं लाज आमुची रक्षावी आजी ॥
गुलाम अपुला बंदा विनवीं भेटावें मजला
मज गरिबाच्या यावें आपुण पाहुणचाराला ॥
ससैन्य देखुनि खाविंदांना धडकी मज भरली
खडे येउनी मजला द्यावी भेट तुम्ही अपुली ॥
प्रतापगड हें भेटायाचें ठिकाण ठरवीलें
प्रसन्न होउनि दर्शन द्यावें खाविंदें अपुलें ॥ "
सर्प विखारी पंताजीनें पुंगीं गुंगविला
हुरळुनि जाउनि धुंदपणानें खान तदा डुलला ॥
कृष्णाजीचा मानस तैसा देखुनि 'अफजुल्ला
भेटायाला निश्चित येइन कळवा जा वदला ॥
मुलुख पहाडी बिकट प्रसंगीं दगाहि देईल
सैन्य लढविणें सैतानाशीं निरर्थ होईल ॥
उद्यां शिवाजी विजापुराला निश्चित जाईल
यवनी सत्ता तदा अबाधित जाणा चालेल ॥

⁂ ⁂ ⁂

स्वराज्यकार्यीं अवघड संकट उद्भवलें हें कां ?
विजयश्रीच्या सोपानाचीं व्यसनें पदपिठिका ॥
जयाजयाची कर्मवीर कां पर्वा करणार
कर्तव्याचा पथ दावाया ज्यांचा अवतार ॥
सत्यावरती अढळ जयांची श्रद्धा ठसलेली
कर्तव्याच्या रणीं भराभर घेती ते उसळी ॥
कर्तव्याच्या कटुतर मार्गीं दुप्पट जोरानें
हिंदभूमिचे लाल उसळले अमोघ धैर्यानें ॥
धीरवरांची धैर्यदेवता जणुं रखरखलेली
शिवरायाची मूर्ती केवळ वैश्वानर ढेली ॥

अन्यायाचा कळस देखतां हृदय न भडभडलें
असे नरपशू कधीं महीवर कोणी देखियले ? ॥
स्वतंत्रतेच्या वातावरणीं स्वैरविहाराची
जयास गोडी रुचेल कैशी बेडी दास्याची ? ॥
टपटप ललना अश्रु ढाळतां हृदय न कां कांचे
न्यायदेवता-खून विलोकुनि कुणा मराठ्याचें ? ॥
स्वतंत्रतेचा स्वतंत्र आत्मा राणा शिवराया
यवनांधांची जुलुमी सत्ता धजला उलथाया ॥
माय जिजाई वरदकर शिरीं ठेवीं शिवबाच्या
प्रेमळ वचनीं धैर्य उपजवी हृदयीं तनयाच्या ॥
रामदास गुरु राजकारणीं दक्ष जया करिती
त्या शिवबाची वर्णायाला समर्थ कोण कृती ? ॥
जनतारूपी जनार्दनाचा आशीर्वाद जया
धीर संकटीं सुटेल कैसा वीरमणीचा या ? ॥
चिलखत आंगीं घालुनि वरती अंगरखा चढवी
प्रसंग जाणुनि शिवबा हस्तीं वाघनखें बसवी ॥

⁘ ⁘ ⁘

माय भवानी वंदुनि शिवबा प्रतापगडिं आला
वरि वरि पिळुनी मिशा तसाही खान पुढें झाला ।
अपमानाची भाषा वदला शिवबाला खान
तिडिक मस्तकीं उठतां झाले लालबुंद नयन ॥
“ कुणबट कुठला शेती सोडुनि युद्धा आलासी
जंबुक कुठला यवन केसरी वैर करीतोसी ? ॥ ”
“ उडव उडव जा गर्दन त्याची ” संभाजी वदला
श्रीशिवछावा मत्त करीवर उसळुनि जणुं उठला ॥
हाय ! हाय ! परि कार्यकुशलता कोठें जनकाची
झाली व्यसनें तव वीर्याची किंमत कवडीची ! ॥
“ भंडमुंजचा भिकार पोरा धंदा तव पाहीं
स्वदेश अमुचा असा तुडवितां लाज न कां कांहीं ! ” ॥

मान-धनाचे मानी पुतळे उठले गर्जोनी
अपमानाचीं शल्यें गेलीं काळिज भेदोनी ॥
शिवरायाची मान आपुल्या बगलीं दाबुनिया
असि उपसोनी खान लागला हृदया भेदाया ॥
घात करावा वचन देउनी यापरतें दुसरें
शिवबा पातक असेल जगतीं वाटे तुज का रे ? ॥
वीर एकला धरुनि भरंवसा आला भेटाया
धजावेल कर का वीराचा वीरा माराया ? ॥
क्षात्रधर्म का मलीन इतुका भूल कशी पडली
वीरांचा मी छावा अगळिक करूं कशी असली ॥
" रुतला कंटक कंटक घेउनि काढावा नीती "
जशास तैसें न्याय जगाचा ज्ञाते आचरिती ॥
विचार-लाटा उसळुनि नाना पसरति चोहिंकडे
सहजीं मिटतां लोचन दिसलीं चित्रें त्यास पुढें ॥
शांतरसाची केवळ मूर्ती ठेली मातेची
ओळख हृदयीं ठेव बोलली निज कर्तव्याची ॥
सर्प विखारी जिवंत सोडुनि हित साधिशि काय ?
ठेंच ठेंच हा गरल ओकला आहे हा समय ॥
हळहळणारा दीन मावळा हळुच पुढें आला
ह्या पोटाची चिन्ता वदला तुजविण कोणाला ? ॥
टपटप ललना अश्रु ढाळितां पाहवतें तुजला
गोमातांची कत्तल चाले धर्म पार बुडला ॥
मायबाप तूं सखा जिवीचा तोडी हा जाच
गुलामगिरिनें हृदयां अमुच्या पडलासे कांच ॥
विचार असले घातुक शिवबा टाकुनि दे सगळे
गरीब दुबळा जरी मावळा मनिंचें मीं कथिलें ॥
हृदयद्रावक मूर्ती त्याच्या नयनीं ती खिळली
डोळे मिटले परी न मूर्ती तिळही ती हलली ॥

जनतात्मा तूं तुझ्या जिवावर उठला तो यवन
मायभवानी इच्छित आहे नीचाचें मरण ॥
मोह कसा हा ऐन प्रसंगीं शिवबा तुज पडला
ऊठ ऊठ हो तयार आतां त्याला वधण्याला ॥
स्वातंत्र्याचें कार्य भवानी त्वत्करीं करवीते
विरोध वीरा धरिसि काय तूं तीच्या इच्छेतें ? ॥
काळा काळा काळ सर्प हा केव्हां चावेल
कोण भरंवसा देईल याचा केव्हां उलटेल ॥
प्रकाश हृदयीं पडुनि तयांचा विचार मनीं ठसला
माय जिजाई ! सख्या मावळ्या ! पाळिन वचनाला ॥
विलंब झाल्या प्राण आपुला अवश्य जाणार
महाराष्ट्र हा गुलामगिरिच्या नरकीं पडणार ॥
विचार करुनी खरतरनखरीं खानतनू चिरली
नरसिंहाची मूर्ति भयानक वाटे अवतरली ॥
शिवरायाचें शिर उडवाया यवन पुढें आला
जीवाजीच्या समशेरीला तदा बळी पडला ॥
शिवरायाची विजयदुंदुभी तेव्हां दुमदुमली
वीर मराठे भाला फेंकित घेति रणीं उसळी ॥
अल्ला ! अल्ला ! एकच गिल्ला उठला चोहिंकडे
यवनीसेना पळो लागली वाट फुटे तिकडे ॥
वीर मराठे शांतवुनीया शिवबा त्या वदला
भले मराठे झटा सदोदित ईप्सित कार्याला ॥

⁂ ⁂ ⁂

लावण्याची मोहक पुतळी पत्नी शिवबाची
नयनीं जीच्या तेज अलौकिक चांदणि गगनींची ॥
शालु लेउनी मंदमंद पद टाकित ती आली
शिवरायाचें स्वागत करण्या आतुर बहु झाली ॥
निजनाथाला नयन भरोनी बघावया बसली
दासीहस्तीं देउनि पंचारती उभी ठेली ॥

शीतल लहरी कुंतल हलवुनि खुलविति मुख फार
कुरळया कुरळया कुटिल कुंतला करें करी दूर ॥
पुष्पें करिंचीं नभिंच्या तारा तशा विलोकूनी
सती सोयरा काय बोलली शिवबाची रमणी ॥
तारातति ही सुरांगनांनीं फुलें उधळलेलीं
सुरसुमनांची सर सुमनाला भूतलिंच्या कुठली ? ॥
प्रेमरसाच्या सिंचनिं करुनी सरस सुमें सगळीं
सुर-सुमनांना पहावयाला लाविन मी खालीं ॥
हौस मनींची पुरवायाला आतुर ती झाली
कोड जिवींचें पुरवायाला शिवबा घे उसळी ॥
विजयदुंदुभि शिवरायाची पडतांची कानीं
हार घेउनी सज्ज जाहली शिवबाची रमणी ॥
द्वारीं येतां ओंवाळुनिया हार गळां घाली
कंठ दाटतां प्रेमरसाला भरती मग आली ॥
कार्य पाहुनी शिवरायाचें जडसृष्टी डुलली
जनता सारी आनंदाच्या रसीं तदा बुडली ॥
झालें सरलें शिवरायाचें लहानसें गीत
यथामती तें ऐकविलें मीं ठेवा हृदयांत ॥

⁘ ⁘ ⁘

म्हणतिल भोळे कुणी कृतीला कपटाची करणी
पुसा तयाला कपट कशाला म्हणती जावोनी ॥
मुळमुळ कोणी मवाळ वदतां लक्ष्य न द्या तिकडे
सत्यद्वेषी किती पसरले पाहीं चोहिंकडे ॥
बडबडण्याला त्यांच्या आतां भीक न घालि कुणी
सत्यरवीचा प्रकाश पडतां जाती लोपोनी ॥
वृथा वल्गना अजवर केली ठरली ती फोल
कोल्हेकुइची कधीं केसरी पर्वा का करिल ?॥
स्वभाव मानी नरहरिचा जधिं आम्हां उमजेल
स्वत्व आमुच्या हृदयीं तेव्हां अवश्य बाणेल ॥

स्वराज्य स्थापुनि कर्मवीर तो झाला शिवराया
चला मराठे असा अमोलिक कित्ता गिरवूं या ॥
शिवरायाच्या जयजयकारें स्वदेश घुमवूं या
स्वातंत्र्याची ज्योत देशभर अता पेटवूं या ॥
मोठे वदले तसेच वदती कळवा त्यां अंधां
राजनीतिचा धडा घ्यावया रामदास शोधा ॥
स्वार्थासाठीं सत्त्वालाही तिलांजली दिधली
गुलामगिरिची लोहशृंखला भालीं लिहिलेली ॥

⁘ ⁘ ⁘

शिवरायाचा भाट होउनी धन्य जहालासी
ऐकवुनी तव गीत अम्हांला पावन केलेंसी ॥
वीररसानें थबथबलेला पोवाडा असला
गाउनि वरिवरि वीररसाचे करवीं पान मला ॥
शेला कटिचा संभाजीनें काढुनिया दिधला
धन्य धन्य तूं वच हे सहजीं संभाजी वदला ॥
प्रफुल्ल वदनें एकीकडची दुसरी सुकलेली
उदय कालिंच्या सरोवराची शोभा उमटेली ॥
भूत होउनी हा पोवाड्या येथ कसा आला
गाडुनि त्यांना टाकायाचा यत्न कसा फसला ॥
एक क्षणभरी येथ नको हा हा अमुचा काळ
मुठींतील मम पोपट सुटतां दैन्य ओढवेल ॥
संभाजीचे कान भरोनी कांटा उपटूं का
घालुनि मारेकरी तयाला आजच मारूं का ?॥
संभाजीला यांत काय तें आहे कळवाया
गोड गोड वच बोलुनि फसवुनि आजच मारूं या ॥
विचार ठरवुनि कलुषा अपुल्या मनीं तया वदला
गीत ऐकुनी भरतें ये ना कोणा वीराला ॥
गीतें अपुलीं ऐकायाची इच्छा मज झाली
उद्यां सकाळीं गीत ऐकवा विनती ही अपुली ॥

विनाशकालीं बुद्धी फिरते ज्ञाते वदताती
मृदुवचनाला भोळे फसले किती तरी जगतीं ॥
गरिब मावळा त्या बोक्याच्या वचना बळि पडला
सकाळची ती अजुनि प्रतीक्षा करीत तो बसला ॥



ग्रंथ
९५४०

सा आधाराला घेऊन त्यांत कवि आपल्या कल्पनांचीं व विचारांचं फुलें ओंवून मनोहर काव्यहार रचून जनतेच्या गळ्यांत घालतात. आणि हाराचे रसिक भोक्ते पुष्पांच्या सौंदर्यानें आणि सुगंधानें मोहित होतात; ते सूत्राच्या बळकटपणाकडे किंवा रंगारूपाकडे दुर्लक्षच करितात. ही रसिकदृष्टि ठेवून रा० दामले यांच्या या शाहिरी कवितेकडे पाहिलें पाहिजे. म्हणजे मग कोणीही असा अभिप्राय देईल कीं, रा० दामले यांची कविता प्रसन्न व उदात्त आहे. तिच्या वाचनानें उच्च मनोवृत्तींचें पोषण होईल अशी तिची रचना आहे. [illegible]पणासारख्या दोषांची बाधा रा० दामले यांनीं आपल्या रचनेला [illegible] दिली नाहीं. श्री शिवाजीमहाराजांचें पुण्यस्मरण सर्वत्र महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेरही सांप्रत जोरानें करण्यास सुरुवात झाली आहे अशी सुसंधि साधून रा० दामले यांनीं आपल्या स्फूर्तिचा ओघ या प्रचंड राष्ट्रीय स्मृतिसागराला मिळवून देण्याची इच्छा धरावी, हें अगदीं उचित होय. रा० दामले यांच्या या कृतीला उत्तेजन मिळावें म्हणजे त्यांच्या कविहृदयाला ज्या संवेदना होतील त्या प्रगट करून संवादि संवेदना सर्वत्र उठविण्याची त्यांची हौस वाढेल.

वैशाख शुद्ध १ शके १८४९
पुणें.

दत्तो वामन पोतदार.

---

REFBK-0019500
REFBK-0019500

प्रकाशक—वासुदेव भास्कर दामले, बी. ए.
५५९ नारायण पेठ, पुणें शहर.

मुद्रक—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.